महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १४ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## मतदान प्रक्रियेसाठी मुंबई पोलिस सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : महापालिका निवडणुकीचा प्रचार थंडावल्यांनतर मतदान आणि मतमोजणीपर्यंतीची महत्वाची प्रक्रिया शांततेत, मोकळ्या आणि पारदर्शी वातावरणात पार पाडण्यासाठी शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवल्याचा दावा मंगळवारी मुंबई पोलिसांनी केला. मंगळवारी संध्याकाळी पाचच्या ठोक्याला निवडणूक प्रचार थांबला. प्रत्यक्षात त्यानंतरच पैसेवाटप, वस्तू वाटप सुरू होते, या अनुभवामुळे दाट लोकवस्तीचे, राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या संवेदनशील असलेल्या प्रभागांमध्ये पोलिसांनी मंगळवार संध्याकाळपासून मतदान प्रक्रिया संपेपर्यंत विशेष उपाययोजना आखल्या आहेत. यात गस्त वाढवणे, राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसोबतचा समन्वय दृढ केल्याचे सांगण्यात आले. ठरावीक धर्म, समाज, भाषिक नागरिकांनी मतदानासाठी घराबाहेर पडूच नये या उद्देशाने ठराविक राजकीय पक्ष स्वतःच्या सोयीने रणनिती आखतात. त्यामुळे त्या त्या प्रभागातील मतदानाचा टक्का घसरतो. असे प्रकार घडू नयेत, बोगस मतदान होऊ नये यासाठी सर्वत्र करडी नजर ठेवून आहोत, असे मुंबई पोलीस दलाकडून स्पष्ट करण्यात आले. ठाकरेबांधूनी बोगस मतदान, दुबार मतदान टाळण्याच्या उद्देशाने भगवा गार्ड या नावाने कार्यकर्त्यांची फौज प्रत्येक मतदान केंद्राबाहेर तैनात ठेवू, अशी घोषणा केली आहे. त्यामुळे निर्माण होणारा संघर्ष, राजकीय शत्रुत्वातून उद्भवणारी कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न हाताळण्यासाठी सज्ज असल्याचे पोलिसांनी सांगितले.

२५ हजार पोलिस तैनात

१५ जानेवारी रोजी आयुक्त देवेन भारती यांच्या थेट देखरेखीखाली १० अतिरिक्त पोलीस आयुक्त, ३३ पोलीस उपआयुक्त, ८४ सहायक आयुक्त यांच्यासह तीन हजाराहून अधिक पोलीस अधिकारी आणि २५ हजाराहून अधिक अंमलदार असा ताफा शहराच्या कानाकोपऱ्यात तैनात असेल. संवेदनशील प्रभागांमध्ये पोलिस बंदोबस्तासह एसआरपीएफ, क्युआरटी, बीडीडीएस, आरसीपी, गृहरक्षक दल आदी विशेष तुकड्या तैनात ठेवल्या जातील, असे सांगण्यात आले.



संघर्ष, राजकीय शत्रुत्वातून उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न हाताळण्यासाठी सज्ज असल्याचे पोलिसांनी सांगितले

### २५ हजारांहून अधिक मनुष्यबळ तैनात

## मतदान केंद्र शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : राज्यातील महापालिका निवडणुकांची आता घोषणा झाली आहे. त्यामुळं उमेदवारांची प्रचाराची लगबग सुरु होणार असून घरोघरी उमेदवार भेटीगाठी घेण्यासाठी येतील. त्याचबरोबर मतदानाच्या दिवशी आपलं मतदान कुठल्या केंद्रावर असेल? आपल नाव मतदार यादीत आहे की नाही? हे तपासून घेणं मतदार म्हणून गरजेचं आहे. या सगळया गोष्टी आयत्यावेळी मतदान केंद्रावर जाऊन शोधण्यात तुमचा बराच वेळ वायाला जाऊ शकतो. त्यामुळं तुम्हाला आता घरच्या घरी मतदार यादीतील नाव आणि मतदान केंद्र तपासून पाहता येणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं एक ॲप आणलं आहे. ॲपमध्ये काय तपासता येईल? राज्य निवडणूक आयागोचं पोर्टल आहे या पोर्लटलवर मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये मतदारांचं संपूर्ण नाव किंवा EPIC क्रमांक टाकून सर्चची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याशिवाय राज्य निवडणूक आयोगानं मताधिकार नावाचं एक ॲप विकसित केलेलं आहे. यामध्ये देखील मतदारांना त्यांचं नाव, प्रभाग, मतदान केंद्र ही माहिती मतदारांना उपलब्ध होणार आहे. सध्या हे मोबाईल ॲप अँड्रॉईडवर उपलब्ध आहे. तसंच ॲपलच्या मोबाईलमध्ये देखील हे आता उपलब्ध करुन दिलं जाणार आहे. कधीपासूनची यादी ग्राह्य धरणार या महापालिका निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची मतदार यादी वापरली जाणार आहे. म्हणजेच १ जुलैपर्यंत ज्या मतदारांची नावं यादीमध्ये आधीच आहेत किंवा ज्या मतदारांनी नव्यानं पण १ जुलैपूर्वी नाव नोंदणी केली आहे, अशा सर्व मतदारांची नाव ही या निवडणुकीसाठी ग्राह्य धरली जाणार आहेत. म्हणजेच १ जुलैनंतर जर तुम्ही नाव नोंदवलं असेल तर तुमचं नाव या निवडणुकीसाठीच्या मतदार यादीत येणार नाही. तुम्हाला थेट पुढच्याच निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येईल.



## कल्याण-डोंबिवलीत रंगली अटीतटीची लढत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली, ता. १३** : कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीचा धुरळा अखेर शांत झाला असला, तरी राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे. महायुती, शिवसेना (ठाकरे गट), मनसे आणि काँग्रेस-राष्ट्रवादी अशा सर्वच आघाड्यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने काही प्रभागांत विजयाचा मार्ग अत्यंत खडतर झाला आहे. आता सर्वांच्या नजरा येत्या २४ तासांतील घडामोडींकडे आणि १५ जानेवारीच्या मतदानाकडे लागल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत केवळ पक्षनिष्ठा नाही, तर उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा आणि 'कामगिरी' याचा कस लागणार आहे. डोंबिवली पॅनेल २९ मध्ये हाय-व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळत आहे. येथे शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपचे उमेदवार आमनेसामने आल्याने युतीमधील संघर्ष टोकाला पोहोचला आहे. पाटील बंधू विरुद्ध भाजप अशा या लढतीत राजकीय आणि आर्थिक ताकद पणाला लागली आहे. कल्याण पश्चिमच्या प्रभाग २ मध्ये शिवसेनेच्या शालिनी वायले यांच्यासमोर भाजप आणि ठाकरे गटाने तगडे आव्हान उभे केले आहे. येथे पाणी आणि रस्ते या प्रश्नांवर




महिला मतदार कुणाच्या पारड्यात मत टाकतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. डोंबिवली पश्चिमला पॅनेल २५ मध्ये मनसेच्या धात्रक परिवाराने भाजपच्या स्थानिक उमेदवारांसमोर मोठे संकट उभे केले आहे. जुन्या भाजप कार्यकर्त्यांची नाराजी मनसेच्या पथ्यावर पडण्याची चिन्हे आहेत. एककीकडे चुरशीच्या लढती असताना, दुसरीकडे महायुतीची संघटनात्मक ताकद काही ठिकाणी स्पष्टपणे दिसून आली आहे. विशेषतः डोंबिवली पश्चिम आणि मध्य भागात मनसेच्या उमेदवारांना तरुण मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे येथे भाजप-शिवसेना महायुतीसमोर सरळ विजय सोपा राहणार नाही, असे संकेत आहेत. डोंबिवली पश्चिमला पॅनेल २५ मध्ये मनसेने धात्रक परिवाराला उमेदवारी दिली आहे. भाजपकडून स्थानिक चेहऱ्यांना संधी दिली गेली आहे. मात्र, भाजपमध्ये गेली अनेक वर्षे राहिलेले धात्रक आणि त्यांचे प्रभागातील काम यामुळे

### प्रचार संपला
### निकालाची धाकधूक

आताच्या भाजपच्या उमेदवारांना सहज विजय शक्य नाही. पॅनेल २२ मध्ये शिंदसेनेकडून विकास म्हात्रे, कविता म्हात्रे यांना उमेदवारी दिली आहे, तर भाजपकडून प्रकाश भोईर यांना उमेदवारी दिली आहे. मनसेने येथे संदेश व रसिका पाटील यांना उमेदवारी दिली आहे. येथे मनसेने वातावरणनिर्मिती केली आहे. त्यामुळे प्रकाश भोईर यांना काटे की टक्कर येथे मिळणार आहे. कल्याण पॅनल १७ मध्ये मोरेश्वर भोईर व कुणाल पाटील धनंजय गायकर आणि प्रज्ञेश पाटील हे ठाकरे गटाचे उमेदवार तगडी लढत देत आहेत. पॅनेल ६ मध्ये शिंदे गटाचे संजय पाटील विरुद्ध ठाकरे गटाचे उमेश बोरगावकर यांच्यात तगडी लढत होणार आहे. एकूणच, कल्याण-डोंबिवली महापालिकेची ही निवडणूक महायुतीसाठी सत्तेची चाचणी ठरणार आहे, तर विरोधकांसाठी अस्तित्व टिकवण्याची आणि पुन्हा उभारी घेण्याची संधी आहे.

## शहापुरात सिकलसेलचा वाढता धोका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : सिकलसेल ॲनिमिया आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या ठाणे जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीदरम्यान अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. मात्र, त्या आधीच शहापूर तालुक्यात सिकलसेल ॲनिमियाची गंभीर स्थिती समोर आली आहे. तालुक्यात तब्बल ८५० रुग्णांना सिकलसेल ॲनिमिया आजाराची लागण झाल्याचे आढळून आले आहे. तर ४८ रुग्ण तीव्र सिकलसेल ॲनिमियाग्रस्त म्हणून नोंदविले आहेत. त्यामुळे सध्या शहापूर तालुक्यात एकूण ८९८ रुग्ण या आजाराशी झुंज देत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे चार वर्षांत तालुक्यातील पाच तीव्र सिकलसेल ॲनिमियाग्रस्त रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे सिकलसेल ॲनिमियाच्या निर्मूलनाचे मोठे आव्हान आरोग्य यंत्रणेपुढे उभे राहिले आहे.

महानगरपालिका निवडणूक - २०२५ - २६

आपलं एक मत ठरविणार




मतदान दि १५ जानेवारी २०२६
वेळ - सकाळी ७:३० ते सायं ५. ३०

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान...
सांगतंय संविधान!

## २७ गाव संघर्ष समितीचा एल्गार

### मुद्दा न मांडणाऱ्यांना मतदानातून धडा

### स्वतंत्र नगरपालिकेला पाठिंबा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : २७ गाव सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने २०१५ रोजी निवडून दिलेल्या सर्व नगरसेवकांविरोधात एल्गार पुकारला असून २७ गावांचा मुद्दा न मांडणाऱ्या उमेदवारांना मतदानादिवशी अद्दल घडविणार असल्याची भूमिका मांडत स्वतंत्र नगरपालिकेचा मुद्दा उचलणाऱ्या मनसे, शिवसेना(उबाठा), काँग्रेस, एनसीपी (एसपी) पक्षाला पाठिंबा २७ गाव सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीची बैठक पार पडली यावेळी त्यांनी हा निर्णय घेतला.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीबाबत २७ गावांतील नागरिकांची भूमिका सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने मांडली आहे. काही दिवसांपूर्वी जो पर्यंत या २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका होत नाही तोपर्यंत निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार विरोधी पक्षांनी पाठींबा दिला होता. मात्र सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केल्याने विरोधकांनी देखील आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. आज प्रचाराच्या शेवटच्या दिवसापर्यंत कोणकोणत्या पक्षांनी २७ गावांच्या अस्मितेचा प्रश्न घेतला आहे हे समितीने पहिले आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी २७ गावांच्या स्वतंत्र नगरपालिकेचा मुद्दा प्रचारात मांडला आहे.

मात्र सत्ताधारी पक्षांना याबाबत गांभीर्य नसून, त्यातल्या त्यात मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच कल्याण येथे झालेल्या सभेत २०१५ साली २७ गावांच्या स्वतंत्र नगरपालिकेच्या दिलेल्या आश्वासनाची पुनरावृत्ती केली असून एकाच गोष्टीसाठी दहा वर्षे पाठपुरावा करावा लागत आहे हि खेदाची बाब आहे. निवडणुकीनंतर संघर्ष समितीच्या वतीने त्यांच्यावर दबाव आणू, मात्र हा विषय नगरविकास खात्याकडे प्रलंबित असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या खात्याचे मंत्री आहेत. हा चेंडू त्यांच्या कोर्टात असून याबाबत शून्य टक्के समर्थन त्यांच्याकडून येत आहे. प्रचारात शिवसेनेचे उमेदवार २७ गावांच्या स्वतंत्र नगरपालिकेच्या विरोधात होते. त्यामुळे ज्या ज्या पक्षांनी स्वत्तान्त्र नगरपालिकेबाबत समर्थन दिले आहे त्यांच्या पाठीशी संघर्ष समिती आणि २७ गावांतील नागरिक उभे असून ज्यांनी हा मुद्दा घेतला नाही त्यांना मतदानाच्या दिवशी अद्दल घडविणार असल्याची भूमिका २७ गाव सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने मांडली आहे.






मकर संक्रात या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. भारतीय संस्कृतीत हा सण आपापसातील कलह विसरून प्रेमभाव वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येक जीव 'तीळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणून जवळ येतो. हा सण तिथीवाचक नाही. सध्या मकर संक्रांतीचा दिवस १४ जानेवारी हा आहे. सूर्यभ्रमणामुळे पडणारे अंतर भरून काढण्यासाठी क्वचित प्रसंगी संक्रांत एक दिवसाने पुढे ढकलली जाते म्हणजे १५ जानेवारीला असते. २०२६ मध्ये मकर संक्रांत १४ जानेवारीला आहे. हिंदु धर्मात संक्रांतीला देवता मानले आहे. संक्रांतीने संकरासुर दैत्याचा वध केला, अशी कथा आहे. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवसाला किंक्रांत अथवा करिदिन असे म्हटले जाते. या दिवशी देवीने किंकरासुराला ठार मारले.

हा प्राकृतिक उत्सव आहे, म्हणजे प्रकृतीशी ताळमेळ साधणारा उत्सव. दक्षिण भारतात हे पर्व 'थई पोंगल' नावाने ओळखले जाते. सिंधी लोक या पर्वाला 'तिरमौरी' म्हणतात. महाराष्ट्रात तसेच हिंदी भाषिक 'मकर संक्रांत' म्हणतात आणि गुजरातमध्ये हे पर्व 'उत्तरायण' नावाने ओळखले जाते.

या दिवशी सूर्याचे उत्तरायण चालू होते. या दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वातावरण अधिक चैतन्यमय असल्याने साधना करणाऱ्याला या चैतन्याचा लाभ होतो. कर्क संक्रांती पासून मकर संक्रांती पर्यंतच्या काळाला 'दक्षिणायन' म्हणतात. दक्षिणायनापेक्षा उत्तरायणात मरण येणे अधिक चांगले समजले जाते.

'संक्रांतीचा काळ हा साधनेला अनुकूल असतो; कारण या काळात ब्रह्मांडात आप, तसेच तेज या तत्त्वांशी संबंधित कार्य करणाऱ्या ईश्वरी क्रियालहरींचे प्रमाण अधिक असते.' – सूक्ष्म जगतातील 'एक विद्वान' (२२.२.२००५, रात्री)

**मकर संक्रांतीच्या पर्वकाळात दान द्या !**

दानात कोणत्या वस्तू द्याव्यात ? 'नवे भांडे, वस्त्र, अन्न, तीळ, तीळपात्र, गूळ, गाय, घोडा, सोने किंवा भूमी यांचे यथाशक्ती दान द्यावे. या दिवशी सुवासिनी दान देतात. काही पदार्थ सुवासिनी कुमारिकांकडून लुटतात आणि त्यांना तीळगूळ देतात.' सुवासिनी हळदी – कुंकवाचा कार्यक्रम करून जे देतात, त्याला 'वाण देणे' असे म्हणतात.

**तीळगुळाचे महत्त्व तीळ सत्त्व लहरी ग्रहण अन् प्रक्षेपण करतो. तीळगुळाचे सेवन केल्याने अंतर्शुद्धी होऊन साधना चांगली होते. इतरांना तीळगुळ देण्यापूर्वी देवासमोर ठेवल्याने त्यातील शक्ती व चैतन्य टिकून रहाते. समोरच्याला दिल्यावर त्याच्यातील प्रेमभाव आणि सकारात्मकता वाढते**

**वाण देणे** : सुवासिनी हळदी – कुंकवाचा कार्यक्रम करून जे देतात, त्याला 'वाण देणे' असे म्हणतात. 'वाण देणे' म्हणजे दुसऱ्या जिवातील देवत्वाला तन, मन आणि धन यांनी शरण जाणे. संक्रांतीचा काळ साधनेला पोषक असल्याने या काळात दिलेल्या वाणामुळे देवतेची कृपा होऊन जिवाला इच्छित फलप्राप्ती होते.

सात्त्विक वाण दिल्याने होणारे लाभ दर्शवणारे सूक्ष्म-चित्र

सात्त्विक वाण दिल्यामुळे ईश्वराशी अनुसंधान साधले जाऊन दोन्ही व्यक्तींना चैतन्य मिळते. सात्त्विक वाण देणे, हा धर्मप्रसारच असून त्यामुळे ईश्वरीकृपा होते.

आजकाल अधार्मिक वस्तूंचे वाण देण्याची चुकीची प्रथा पडली आहे. या वस्तूंपेक्षा सौभाग्याच्या वस्तू, उदबत्ती, उटणे, धार्मिक ग्रंथ, पोथ्या, देवतांची चित्रे, अध्यात्मविषयक ध्वनीचित्र-चकत्या इत्यादी अध्यात्माला पूरक अशा वस्तूंचे वाण द्यावे.



मा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्री अनमोल सागर (भा प्र से) यांनी दांडेकर विद्यालय येथे करण्यात येणाऱ्या मॉडल बूथ (पर्यावरण पूरक मतदान केंद्र) च्या कामाचा आढावा घेतला या प्रसंगी मा अतिरिक्त आयुक्त श्री विठ्ठल डाके, मा शहर अभियांता श्री जमील पटेल, अति शहर अभियांता श्री सचिन नाईक, मुख्य उद्यान अधिकारी श्री निलेश संख्ये, उपाभियंती श्री विनोद भोईर हे उपस्थित होते.

# बिर्ला महाविद्यालयात हवामान बदल विषयक राष्ट्रीय परिषद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राष्ट्रीय युवा दिन तसेच पूज्य बसंत कुमारजी बिड़ला यांच्या १०५व्या जयंतीच्या प्रसंगी बी. के. बिड़ला कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स (एम्पॉवर्ड ऑटोनॉमस स्टेटस), कल्याण येथील एनएसएस विभागातर्फे सोमवारी "हवामान बदल आणि युवा : कृतीची वेळ" या विषयावर एक दिवसीय आंतरविषयक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली.




स्वामी विवेकानंद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा होणारा राष्ट्रीय युवा दिन युवकांना धैर्य, सेवा आणि समाजाप्रती जबाबदारीची प्रेरणा देतो. या परिषदेद्वारे दूरदृष्टी असलेले उद्योगपती, महान समाजसेवक व राष्ट्रनिर्माते पूज्य बसंत कुमारजी बिड़ला यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मूल्याधिष्ठित नेतृत्व, शिक्षणावरील निष्ठा आणि समाजसेवा यांचा आदर्श त्यांनी आपल्या जीवनातून घालून दिला असून, बी. के. बिड़ला कॉलेजसारख्या संस्था त्यांच्या विचारांद्वारे सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडवत आहेत.

उद्घाटन सत्रात हवामान बदलाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी युवकांच्या सक्रिय सहभागाची तातडीची गरज अधोरेखित करण्यात आली. वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, पूर, दुष्काळ आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे हवामान बदल ही वर्तमानातील जागतिक समस्या असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. शाश्वत व पर्यावरणपूरक भविष्य घडवण्यात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

मुख्य अतिथी प्रा. अनिल सिंह, सेवानिवृत्त प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग, आयआयटी बॉम्बे यांनी युवकांनी वैज्ञानिक संशोधन व नैतिक जीवनशैलीद्वारे पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे प्रतिपादन केले. डॉ. जयेश आर. बेलारे, प्राध्यापक, आयआयटी बॉम्बे यांनी संशोधन सादरीकरणांच्या दर्जाचे व युवकांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले. डॉ. एल. पी. शिंदे, प्राचार्य, सायन्स कॉलेज, नांदेड यांनी मान्यवर अतिथी म्हणून उपस्थिती लावली. परिषदेत नामांकित संस्थांमधील तज्ज्ञ वैज्ञानिक व संशोधकांनी चार आमंत्रित व्याख्याने सादर केली, ज्यामध्ये हवामान बदल, शाश्वत विकास आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना यांवर सविस्तर चर्चा झाली.

डॉ. नरेश चंद्र, संचालक, बी. के. बिड़ला कॉलेज यांनी विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे पालन करण्याचे तसेच पूज्य बसंत कुमारजी बिड़ला यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन पृथ्वीमातेचे संरक्षण हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य मानण्याचे आवाहन केले. डॉ. अविनाश पाटील यांनी स्वागतपर भाषण केले, तर डॉ. हरिश दुबे व डॉ. महादेव यादव, उपप्राचार्य यांनी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

परिषदेचे आयोजन सचिव डॉ. संदेश जयभाये यांनी आभार प्रदर्शन करत ओ. आर. चितलांगेजी, अध्यक्ष, बी.के. बिड़ला कॉलेज, प्राचार्य, प्राध्यापक, एनएसएस स्वयंसेवक आणि सर्व सहभागींचे आभार मानले. डॉ. सोनाली राजपुर, राकेश भोईर, कोमल तिवारी तसेच इतर विज्ञान शाखेतील प्राध्यापकांनी आयोजन यशस्वी करण्यात सक्रिय भूमिका बजावली.

# पाथरवट समाज उन्नती मंडळ कल्याण क्रिकेट चषक संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण येथे सालाबाद प्रमाणे क्रिकेट चषक 2026 चे आयोजन केले होते दरवर्षी प्रमाणे काही वर्षी सामने धुमधडाक्यात साजरे केले पाथरवट समाज उन्नती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माननीय पद्माकर दादा लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर किरण टोकेकर यांनी नियोजन करून सर्वांच्या सहकार्याने क्रिकेटचे सामने पार पाडले जर सर्वांचे सहकार्य असेल तरच कोणते काम चांगल्या रीतीने होते असे पाथरवट समाजाचे अध्यक्ष डॉक्टर किरण टोकेकर यांनी सांगितले कारण समाज एकत्र यावा सामाजिक बांधिलकी राहावी काहीतरी चांगले काम करावे या उद्देशाने तळमळीने प्रयत्न करतात तर विश्वकर्मा जयंतीला सर्वांनी एकत्र यावे कारण ही जयंती माझ्या घरची नाही विश्वकर्मा जयंती सर्वांनी एकत्र मिळून केली पाहिजे त्यामुळे प्रत्येकानं सामाजिक भान ठेवून काम करावे ज्येष्ठ नागरिक श्री भटु टोकेकर हे शेवटपर्यंत उपस्थित होते ११ जानेवारी 202६ ला इन्फिनिटी तर्फे संकेत कॉलेजच्या मागे चिंचपाडा कल्याण पूर्व येथे क्रिकेटचे सामने धुमधडाक्यात झाले तसेच ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मा.मनोज सानप सर यांनी सर्व क्रिकेट टीमचे खूप खूप अभिनंदन व तर पत्रकार हर्षल खेडकर यांनी सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. देवीदास बामणे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : महाराष्ट्र हिंदी परिषदच्या ३२व्या अधिवेशनाच्या निमित्ताने विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे दोन दिवसांची राष्ट्रीय संगोष्ठी आयोजित करण्यात आली होती. या संगोष्ठीमध्ये डॉ. देवीदास बामणे लिखित 'विवेकी राय के कहानियों का विस्तृत अनुशीलन' या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूर येथील अहिल्याबाई होळकर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाले. त्या प्रसंगी डॉ. वसंतराव मोरे, डॉ. चंद्रदेव कवडे, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. अनिल काळे, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. माधवी जाधव तसेच अनेक साहित्यिक, हिंदी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. देवीदास बामणे हे भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथे हिंदी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते गेली ३२ वर्षे या महाविद्यालयात अध्यापन करत आहेत.या पुस्तकाला पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी 'मनोगत' लिहिले आहे. हे डॉ.देवीदास बामणे यांचे तिसरे पुस्तक असून त्यांनी ते संस्थेचे माजी अध्यक्ष, कुटुंबप्रमुख आणि प्रेरणास्थान आदरणीय ॲड. बापूसाहेब नेने यांना समर्पित केले आहे. पुस्तकात डॉ. विवेकी राय यांच्या दहा कहानी संग्रहांतील एकूण १५० कथांचे सखोल व विस्तृत अनुशीलन करण्यात आले आहे.या सर्व कथांमध्ये ग्रामीण समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचे वास्तव चित्रण दिसून येते. ग्रामीण भागातील गरीब व श्रमिक समाजाचे दुःख, त्यांची बोलीभाषा, जीवनशैली, खानपान, विवाहसंस्कार इत्यादी पैलूंचे अतिशय सूक्ष्म आणि संवेदनशील वर्णन विवेकी राय यांनी आपल्या कथा-साहित्यात केले आहे. त्यांनी सदैव शोषित व वंचित घटकांच्या बाजूने लेखन केले असून, शोषक वर्गावर प्रखर व्यंग प्रहार केला आहे. डॉ. देवीदास बामणे यांनी हे पुस्तक लिहिताना अनेक अडचणींवर मात करत संघर्षातून हे लेखन यशस्वीरित्या पूर्ण केले. या पुस्तकाबद्दल संस्थेचे कुटुंबप्रमुख व माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, मानद सचिव बाळासाहेब जोशी, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, उपाध्यक्ष व खजिनदार संजय कडू तसेच इतर पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पत्रकार बंधू, विद्यार्थी आणि डॉ. बामणे यांचे कुटुंबीय यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम सिनेमा करमुक्त करावा

## - शिक्षण क्रांती संघटना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : 1 जानेवारी 2026 रोजी प्रदर्शित झालेला क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम हा सिनेमा मातृभाषेतून शिक्षणाला चालना देणारा सिनेमा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे देखील हेच उद्दिष्ट आहे. सध्या राज्यात विद्यार्थी संख्खेअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत आणि शाळा बंद पडल्यामुळे त्या शाळांमधील उर्वरित मुलांच्या शिक्षणाची खूप हेळसांड होणार आहे . क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम या सिनेमामध्ये अशा शाळांचे आपल्या जीवनातील महत्त्व व त्यांची आवश्यकता खूप प्रभावीपणे चित्रित केले आहे. हा सिनेमा टॅक्स फ्री केला तर तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल व शिक्षण क्षेत्रात एक चांगले परिवर्तन घडवू शकेल यासाठी हा चित्रपट करमुक्त करून राज्यातील बंद पडणाऱ्या मराठी शाळांना अर्जित अवस्था द्यावी अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस, पदाधिकारी किशोर राठोड, राजेंद्र गवळी, अनिल मुरादे, विनोद आहेर व अभिजित पालव यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.




# स्वामी विवेकानंद संस्थेचा २९ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : सोमवार दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी सरस्वती विद्यालय वासिंद येथे 'भारत सरकार : युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत केंद्र, ठाणे' तर्फे स्वामी विवेकानंद संस्था, पाली, सरस्वती विद्यालय, वासिंद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद संस्था पाली या संस्थेचा २९ वा वर्धापन दिन सोहळा जिल्हा युवा अधिकारी मनीषा शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या आनंद उत्सवात संपन्न झाला. यावेळी भारत सरकार, संसदीय कार्यमंत्रालय राजभाषा समितीचे सदस्य तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण देशमुख, वासिंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर, शहापूर पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी हिराजी वेखंडे, वारकरी तत्त्वज्ञान विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. डॉ.कैलास महाराज निचिते, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल सातवी व सचिव रविंद्र शेलार, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक वासुदेव भोईर, मानव विकास सेवा फाउंडेशनचे संघटक व्ही. एस. पाटील, स्वामी विवेकानंद संस्था पाली या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षणतज्ञ व प्रज्ञावंत साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी सरस्वती विद्यालय वासिंद येथील विद्यार्थ्यांनी सुमधुर सुरात ईशस्तवन सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व ऋणनिर्देश पत्रिका देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. स्वामी विवेकानंद संस्था पाली या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर श्याम शेलार यांनी स्वामी विवेकानंद संस्थेचे राष्ट्रविकासातील योगदान व संस्थेची सन १९९७ पासून ते आजतागायतची २८ वर्षांची देदीप्यमान वाटचाल याविषयीच्या अहवालाचे प्रकट वाचन केले. कार्यक्रम प्रसंगी प्रवीण देशमुख यांनी 'आजच्या युवा पिढीसमोरील आव्हाने', केली हभप डॉ.कैलास महाराज निचिते यांनी 'स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचा युवापिढीला आदर्श' आणि शारदासुत सुनील म्हसकर यांनी 'युवा तेजा जाग रे'... या विषयावर उत्तम उत्तम व्याख्याने सादर करून उपस्थितांचे प्रबोधन केले. तसेच सचिन हुंदळेकर, हिराजी वेखंडे,रविंद्र शेलार यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रम अध्यक्षा श्रीमती मनीषा शर्मा यांनी भारत सरकार : युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत केंद्र, ठाणे या केंद्राचा हेतू, उद्देश स्पष्ट करून केंद्राच्या मार्फत ग्रामीण युवकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम यांची सविस्तर माहिती देऊन युवकांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी ठाणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय व देदीप्यमान कार्य करणाऱ्या विविध प्रभावी व गुणवंत व्यक्तींचा गौरवचिन्ह, पुष्पगुच्छ, पेन व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव व सन्मान करण्यात आला. सुनील म्हसकर यांनी आपल्या सुरेल आणि प्रखर आवाजात स्फृतिगीत सादर करून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प.शिवाजी सातपुते यांनी अतिशय सुंदर प्रकारे केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गीतांजली म्हसकर, आकाश म्हात्रे, अरुण भालेकर, श्याम शेलार, शिवाजी तरणे, दिलीप भोईर, दौलत चव्हाण, कुणाल म्हसकर, तुषार म्हसकर व जीवन म्हसकर आदींनी तसेच स्वामी विवेकानंद संस्थेच्या व विद्या विकास मंडळाच्या सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.




# भविष्यवेध



**बुधवार १४ जानेवारी २०२६**

**मेष**
व्यवसायात तुम्हाला लक्षणीय यश मिळू शकते. आज तुम्ही काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार करू शकता. प्रियजनांचा आणि वडिलांचा सल्ला घ्या.

**वृषभ**
मित्र बनवताना आणि तुमचे विचार इतरांशी शेअर करताना काळजी घ्या, फापटपसारा टाळा. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**मिथुन**
वडील तुमच्या व्यवसायात पाठिंबा देतील. सकारात्मक विचारांना अर्थपूर्ण प्रयत्नांमध्ये वळवले तर सर्जनशील प्रतिभेचा सर्वांना उलगडा होईल .

**कर्क**
लोकांमध्ये तुमचा आदर वाढेल. घरात काहीतरी दुरुस्त करावे लागू शकते. महिलांना घरातील कामातून आराम मिळेल. आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**सिंह**
तुमचे सहकारी आणि वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर खूश होतील आणि तुमची प्रशंसा करतील. आज तुम्हाला योग्य ते निकाल मिळतील. मार्ग तुम्हाला सापडेल.

**कन्या**
हवे असलेले मोठे ध्येय साध्य करण्याचा मार्ग तुम्हाला सापडेल. मुलांना त्यांच्या करिअरबद्दल चांगली बातमी मिळेल. वडिलांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका,

**तुळ**
भविष्यात हे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात प्रगतीच्या संधी तुमच्या वाटेवर आहेत.

**वृश्चिक**
जे सकारात्मक मानसिकता विकसित करण्यास मदत करेल. ऑफिसची कामे पूर्ण करताना लक्ष केंद्रित करा. मिळालेली जबाबदारी नीट पूर्ण कराल.

**धनु**
ऑफिसमधील तुमचे सहकारी तुमच्या कल्पनांनी प्रभावित होतील, परंतु तुम्ही इतरांच्या कामात हस्तक्षेप करणे टाळा. काम सोपे करण्याचा मार्ग सापडेल.

**मकर**
तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील. तुमची इच्छाशक्ती मजबूत राहील. अहंकार तुमच्या मनात येऊ नये म्हणून सावधगिरी बाळगली पाहिजे.

**कुंभ**
करिअरमध्ये प्रगती करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे फायदे होतील. प्रिय व्यक्तीच्या जवळ असल्याने आनंदी व्हाल. सकारात्मक प्रतिमा इतरांसमोर उजळेल.

**मीन**
आर्थिक परिस्थिती मजबूत राहील आणि तुम्ही आवश्यक वस्तू खरेदी करू शकाल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अनुकूल काळ आहे.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# कल्याण-डोंबिवली महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी महापालिका निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून, या सार्वत्रिक निवडणूकीत 31 पॅनलमध्ये बहुसदस्य पध्दतीने निवडणूक संपन्न होणार आहे. या निवडणूकीसाठी 1548 मतदान केंद्रांवर आणि 382 ठिकाणी मतदानाची प्रक्रिया संपन्न होणार आहे. यापैकी 1013 मतदान केंद्रे तळ मजल्यावर, 9 मतदान केंद्रे पहिला मजल्यावर, 471 मतदान केंद्रे पार्टीशन स्वरुपात, 55 मंडपात असणार आहेत.

महापालिका क्षेत्रात एकुण 14,25,086 इतकी मतदारांची संख्या असून, त्यापैकी एकुण 7,45,664 पुरुष मतदार, एकुण 6,78,870 स्त्री मतदार व इतर मतदारांची संख्या 552 इतकी आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणूकीची मतमोजणी एकुण 8 ठिकाणी (निवडणूक निर्णय अधिकारी २ व ४ ची मतमोजणी एका ठिकाणी) होणार आहे.

1. निवडणूक निर्णय अधिकारी - 1 यांचेकडील पॅनल क्रमांक – 2, 3 व 4 ची मतमोजणी बिर्ला वन्य, केडीएमटी इमारत, तळ मजला, शहाड (पश्चिम).
2. निवडणूक निर्णय अधिकारी - 2 यांचेकडील पॅनल क्रमांक – 1, 5, 6 व 10 ची मतमोजणी मुंबई विद्यापीठ यांचे उपकेंद्र, वसंतव्हॅली, खडकपाडा, कल्याण (पश्चिम).
3. निवडणूक निर्णय अधिकारी - 3 यांचेकडील पॅनल क्रमांक – 7, 8 व 9 ची मतमोजणी प्रभाग क्षेत्र 3/क चे कार्यालय, तळ मजल्यावरील वाहन पार्किंग क्षेत्र, आधारवाडी, कल्याण (पश्चिम).
4. निवडणूक निर्णय अधिकारी - 4 यांचेकडील पॅनल क्रमांक – 11, 12 व 18 ची मतमोजणी मुंबई विद्यापीठ यांचे उपकेंद्र, वसंतव्हॅली, खडकपाडा, कल्याण (पश्चिम).
5. निवडणूक निर्णय अधिकारी - 5 यांचेकडील पॅनल क्रमांक – 13, 14, 15 व 16 ची मतमोजणी साकेत कॉलेज, 100 फुटी रस्ता, राम म्हात्रे चौक, काटेमानिवली, कल्याण (पूर्व).
6. निवडणूक निर्णय अधिकारी - 6 यांचेकडील पॅनल क्रमांक – 20, 26, 27 व 28 ची मतमोजणी आयईएस पाटकर विद्यालय, राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व) या शाळेच्या स्टील्ट हॉलमध्ये.
7. निवडणूक निर्णय अधिकारी - 7 यांचेकडील पॅनल क्रमांक – 21, 22, 23 व 25 ची मतमोजणी कडोंमपा शाळा क्र. 20, रेती बंदर रोड, मोठा गांव, डोंबिवली (पश्चिम).
8. निवडणूक निर्णय अधिकारी - 8 यांचेकडील पॅनल क्रमांक – 29 व 30 ची मतमोजणी धनजी नानजी चौधरी विद्यालय हॉल, पहिला मजला, नांदीवली, डोंबिवली (पूर्व).
9. निवडणूक निर्णय अधिकारी - 9 यांचेकडील पॅनल क्रमांक – 17, 19 व 31 ची मतमोजणी सावित्रीबाई फुले कलामंदिर, घरडा सर्कल, डोंबिवली (पूर्व).

# कल्याण पश्चिमेतील जनता शिवसेना–भाजप युतीसोबत ठाम

## – आमदार विश्वनाथ भोईर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पश्चिमेत शिवसेना आणि भाजप महायुतीला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, संघटनात्मक ताकद आणि अनुभवी नेतृत्वाच्या जोरावर विजयाचा विश्वास आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केला आहे. आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने आमदार भोईर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना हा विश्वास व्यक्त केला आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कल्याण पश्चिमेतील आमदार विश्वनाथ भोईर यांनी शिवसेना–भाजप युतीच्या विजयाबाबत ठाम विश्वास व्यक्त केला आहे. ठाकरे गट आणि मनसे यांना विधानसभा निवडणुकीतच पराभवाचा सामना करावा लागला असल्याने त्यांचा धोका आता कमी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत “आव्हान असल्याचे कुठेही वाटत नाही. काही प्रभागांत अपवादात्मक परिस्थिती असू शकते; मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे कल्याण डोंबिवलीवर बारीक लक्ष आहे. आमची टीम अत्यंत तगडी असून मैदानात पूर्ण ताकदीने उतरली आहे. त्यामुळे कोणाचेही आव्हान वाटत नाही,” असेही आमदार भोईर यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, “गेली अनेक वर्षे शिवसेनेवर प्रेम करणारे मतदार आमच्यासोबत आहेत. आम्ही त्यांच्याशी कधीही अंतर ठेवलेले नाही. मतदार आमच्यापासून लांब नाहीत. इतकी वर्षे तुम्ही आमच्या पाठीशी उभे आहात, आताही तीच साथ द्या असे आवाहन करतानाच कल्याण पश्चिमेतील जनता शिवसेना–भाजप युतीच्या पाठीशी ठामपणे उभी राहील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.”

# कल्याण पूर्वेत 21 वर्षीय एअर होस्टेसची आत्महत्या

## आरोपी मोकाट असल्याने मृत तरुणीच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला संताप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पूर्वेत एका 21 वर्षीय एअर होस्टेसने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील आरोपी अजूनही मोकाट असल्याने मृत तरुणीच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त केला आहे.कल्याण पूर्वेत एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. 21 वर्षीय एअर होस्टेस असलेल्या तरुणीने आत्महत्या केली आहे. डिसेंबर महिन्यात तिने आत्महत्या केली होती. परंतु आता या तरुणीने नेमकी आत्महत्या का केली, याचे काही पुरावे समोर आले आहेत. तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून लग्नाचं आमिष दाखवत लाखोंची आर्थिक फसवणूक आणि मारहाण केल्याचा दावा केला जातोय. तरुणीने आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच गंभीर आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. विशेष म्हणजे आता गुन्हा दाखल होऊनही आरोपी मोकाट फिरत असल्याने संतप्त कुटुंबीय आणि महिलांनी थेट पोलीस ठाण्यावर घेराव घालत मोठा गोंधळ घातला आहे.

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस स्टेशन परिसरात एअर होस्टेस असलेल्या 21 वर्षीय तरुणीने 28 डिसेंबर रोजी आत्महत्या केली होती. प्रेमसंबंधांतील छळ आणि फसवणुकीला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलले, असे बोलले जात आहे. या प्रकरणात गुन्हा पीडित तरुणीच्या कुटुंबियांनी कल्याण कोळसवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल होऊनही पोलीस आरोपीला अटक करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप पीडित तरुणीच्या कुटुंबीयांनी केला आहे. कौशिक प्रकाश पावशे असे आरोपीचे नाव आहे.

# मुरबाड कला व क्रीडा महोत्सवामध्ये कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयाचे यश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**मुरबाड** : दि. ०९ जानेवारी ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान मुरबाड येथे जनसेवा प्रतिष्ठान आयोजित मुरबाड कला व क्रीडा महोत्सव २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जनसेवा प्रतिष्ठान चे सर्वेसर्वा, प्रमुख मा. श्री. सुभाषदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी हा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडत असतो. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, योग्य ते व्यासपीठ मिळावं हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून जनसेवा प्रतिष्ठान अश्या महोत्सवाचे आयोजन करीत असते. या महोत्सवात विविध प्रकारच्या कला-क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या ज्यामध्ये कला प्रकारात गायन, वक्तृत्व, लोकनृत्य, भजन, व क्रीडा प्रकारात गोळा फेक, लांब उडी, कबड्डी, खो-खो अश्या वयक्तिक तसेच सांघिक स्पर्धांचा समावेश होता. या महोत्सवात सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा च्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावली. कला प्रकारात गायन स्पर्धेत १७ वर्ष खालील गटात कु. देवेश निचिते याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर क्रीडा प्रकारात वयक्तिक खेळात गोळा फेक या स्पर्धेत खुला गटातून कु. हर्षदा धनाजी हरड ह्या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक,१७ वर्ष खालील (मुली) गटातून कु. सेजल हरेश देसले प्रथम क्रमांक, कु. अचल जगदीश देसले द्वितीय क्रमांक, १७ वर्ष खालील (मुले) गटातून कु. राहुल बंडु खाटेघरे द्वितीय क्रमांक, लांब उडी स्पर्धेत १७ वर्ष खालील (मुली) गटातून कु. समृध्दी कांतिलाल गोरले हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच सांघिक खेळात कबड्डी या स्पर्धेत खुला गटातून (मुली) द्वितीय क्रमांक प्राप्त केला. दि. ११ जानेवारी, २०२६ रोजी या महोत्सवात बक्षीसपात्र गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी विविध मान्यवर अतिथी उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महाविद्यालयातील प्रा. तनुजा देसले मॅडम यांनी खुला गटातून गायन स्पर्धेत सहभाग घेतला होता आणि या स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या प्रसंगी त्यांचाही सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांसमवेत महाविद्यालयातील क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विजय सोनार सर तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री. प्रवीण साबळे उपस्थित होते. या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅडम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### ठाणे महापालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशिक्षण संस्थेत

# यूपीएससी परीक्षार्थींना विशेष मार्गदर्शन

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**



**ठाणे** : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेला बसणाऱ्या प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांसाठी ठाणे महानगरपालिकेच्या वतीने संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था येथे “DAF Form Filling & Preference of Services” या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार नुकतेच विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे माजी विद्यार्थी व सध्या ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात कार्यरत असलेले सनदी अधिकारी डॉ. नितीन जावळे (IAS – २००३) प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

या विशेष व्याख्यानात ठाणे व मुंबई शहरातील यूपीएससी परीक्षार्थींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या कार्यक्रमात डॉ. नितीन जावळे यांनी UPSC DAF फॉर्म म्हणजे काय, तो कसा भरावा, फॉर्म सबमिट केल्यानंतर बदल करता येतात का, सेवा प्राधान्य (Service Preference) कसे द्यावे, त्यात बदल कधी व कसा शक्य आहे, याबाबत सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले.

याशिवाय कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता, सकारात्मक दृष्टिकोन, अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, संयम, प्रामाणिकपणा, सातत्य व आत्मविश्वास यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या संवादात्मक सत्रामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ठाणे महापालिकेचे उपआयुक्त सचिन सांगळे तसेच संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशासकीय सेवेतील अनुभवातून मार्गदर्शन मिळाल्याने हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याचे प्रशिक्षणार्थींनी सांगितले. संस्थेचे गिरीश झेंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी आदिवासी घरे उद्ध्वस्त करून मनोर बाह्यवळण मार्गास विरोध

## –आदिवासी ग्रामस्थांचा ठाम निर्धार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**पालघर** : मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या मनोर गावांतून पालघर या जिल्ह्यातील ठिकाणी जाण्या येण्यासाठी असलेले रस्ता हा मनोर बाजारपेठेतून पुर्विपासून आहे. परंतु वाढती रहदारी आणि रस्ते लागत विकासकांनी / व्यापारी वर्ग यांनी केलेली वाढीव बांधकामे , अतिक्रमणे यामुळे मुख्य मनोर शहर बाजारपेठ येथील पालघर रस्त्यावर वाहनांची गर्दी होऊन वाहतूकीसाठी अडथळा निर्माण होत आहे.

या अनुषंगाने मनोर प्रस्तावित बाह्यवळण मार्ग डोंगरी आदिवासी वस्ती असलेल्या भागातून नेण्याच्या हालचालींमुळे, अनेक वर्षांपासून राहणारे रहिवासी बांधव यांची घरे व्यापारी वर्ग यांच्या हितासाठी तोडून बाह्यवळण रस्ता आदिवासी वस्तीतून नेण्यासाठी नियोजन बद्ध कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामुळे स्थानिक आदिवासी बांधव जे पिढ्यांन पिढ्य घरे बांधून आहेत.त्यांना बेघर करून उध्वस्त केले जात आहे. यामुळे आदिवासी मध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. बाह्यवळण रस्त्यासाठी शेकडो कुटुंबांचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याच्या भीतीने डोंगरी वस्तीतील ग्रामस्थ आक्रमक झाले असून, बाह्यवळण मार्ग मनोर शहर व बाजारपेठेतूनच नेण्यात यावा, या मागणीसाठी मनोर शाळेजवळ हजारोंच्या संख्येने आदिवासी बांधव एकत्र येऊन, विराट सभा भरवून, सभेतून जनआक्रोश व्यक्त करण्यात आला. यावेळी हा बाह्यवळण मार्ग मनोर शहरातील अतिक्रमणे काढून हा बाह्यवळण मार्गा मनोर बाजारपेठेतूनच नेण्यात यावा, अशी ठाम मागणी करीत, ग्रामस्थानी रस्त्यावर उतरण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख वसंत चव्हाण, भाजपचे नेते संतोष जनाठे, बहुजन विकास आघाडीचे नेते प्रशांत घोसाळकर, यासह सर्व पक्षीय नेते यांनी स्थानिक आदिवासी, ग्रामस्थांनावर अन्याय होणार नाही असे आश्वासन दिले. मनोर गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनोर बाजारपेठ रस्ता अरुंद असुन रस्त्यांच्याहदोन्ही बाजूंनी दुकान धिरकांनी पुढील बाजस अतिक्रमणे केल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. वाडा, जव्हार, मोखाडा, तलासरी, डहाणू व वसई तालुक्यांतून पालघर जिल्हा मुख्यालयाकडे जाण्यासाठी मनोर हा एकमेव मार्ग असल्याने या कोंडीचा फटका हजारो प्रवाशांना बसतो. या पार्श्वभूमीवर बायपास अर्थात बाह्यवळण मार्गाची चर्चा गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे.

मात्र मनोर बाजारपेठेतून बाह्यवळण गेल्यास दुकाने बाधित होण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केल्याने, व्यापारी वर्गाच्या हितासाठी, काही राजकीय पुढारी यांनी स्वहिताचा विचार करून,हा रस्ता डोंगरी वस्तीमधून नेण्याचा प्रयत्न सुरू आहे.अशी सर्वत्र खुलेआम चर्चा होत असुन ही, शेकडो गरीब आदिवासी कुटुंबे बेघर होण्याची शक्यता निर्माण झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे बाह्यवळण मार्ग आहे तोच मार्ग बाजारपेठेतूनच काढावा, अशी ठाम भूमिका आदिवासी बांधव आणि ग्रामस्थांनी घेतली आहे. यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. साठी प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य तो विचार करावा अन्यथा होणाऱ्या परिणामांस आदिवासी बांधव जबाबदार राहणार नाही असे आदीवासी बांधवांचे म्हणणे आहे.

# पुष्पांजली आ.कुंभार यांच्या “प्रेमांकुर”काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नेरूळ येथील फ्रुटवाला कल्चरल सेंटर(मराठा हॉल)येथे प्रसिद्ध वक्ते श्री अरूण म्हात्रे यांच्या शुभहस्ते कवयित्री डॉ.सौ. पुष्पांजली आ.कुंभार यांच्या पहिल्या वहिल्या “प्रेमांकुर”काव्यसंग्रहाचे शानदार प्रकाशन झाले.

श्री सुनील उंब्रजकर, पुणे, यांच्या वेदांतश्री प्रकाशनाद्वारे अतिशय आकर्षक मुखपृष्ठ व प्रत्येक कवितेवर शोभेसे रेखाचित्र रेखांटन करून आकर्षक अशी छपाई करण्यात आली आहे. प्रमुख पाहुण्या कवयित्री व प्रसिद्ध निवेदिका सौ.साधना जोशी होत्या.

शिस्तबद्ध,आटोपशीर पद्धतीने समोरच्या श्रोत्यांना सतत जागृत व हसतमुख ठेवणारा हा कार्यक्रम फार देखणा होता. श्री. अरूण म्हात्रे प्रकाशनानंतर बोलताना म्हणाले- “कवयित्री पुष्पांजली यांनी हिरवागार निसर्ग मनांत साठवून कोऱ्या कागदावर अलगद जसाच्या तसा उतरविला आहे.त्यांच्या कविता निसर्गाचे आणि निसर्ग प्रेमाचे गाणे आहे. प्रेमांकुर कवितासंग्रह म्हणजे मोगऱ्याची सुगंधी फुले एकत्र करून केलेला एक सुंदर गजरा आहे. त्याचा सुगंध साहित्य विश्वात दरवळल्याशिवाय राहणार नाही.

प्रमुख पाहुण्या सौ. साधना जोशी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे डॉ.पुष्पांजली यांच्या कवितांचे रसग्रहणात्मक वर्णन करून श्रोत्यांची दाद मिळवली.कवयित्रीच्या 'इंद्रधनुष्य' या काव्य कल्पनेशी अतिशय मार्मिक विवेचन करून प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या.यशवंत देव उद्धृत करताना किती गं तुझे रंग, किती गं तुझ्या छाया, दोनच माझे डोळे,उत्सव जातो वाया. डोळ्यात साठवतो म्हटलं तरी सर्व साठवण्यास मर्यादा पडतात असे कवयित्रीचे कौतुक केले.

वेदांतश्रीचे प्रकाशक उंब्रजकर यांनी हा काव्यसंग्रह आपले २२६ वे पुस्तक असून त्यांच्या छपाईस पुरेपूर न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे प्रतिपादिले. डॉ.सौ.पुष्पांजली कुंभार या स्वतः उच्च शिक्षित आहेत. एम्.ए.,एम्.एड. , पीएच. डी.( शिक्षण शास्त्र) अशा पदव्या संसाराचा गाडा चालवताना संपादन केल्या. त्यांनी प्राध्यापक म्हणूनही काम केले. दोन्ही मुलींच्या (अनुराधा व श्रध्दा )उज्वल भविष्याकरिता आपल्या करिअरचा त्याग करून एकीला कायद्यातील तज्ञ तर दुसरीला इंटरॲक्टीव्ह डिझाईन मध्ये पदव्युत्तर स्नातक बनविले. दोघीही परदेशात स्थायिक होत आहेत. डॉ.पुष्पांजली यांनी आपल्या अनेक कविता मागील पार्श्वभूमी सांगून हा काव्यसंग्रह कसा शेवटीप्रेमाकडे वळतो याचे खुमासदार विश्लेषण केले आहे. सौ. माधवी सूर्यवंशी यांनी स्वागतगीत म्हटले तर सौ. निर्मला भागवत यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमात प्रकाशन होवू घातलेल्या 'प्रेमांकुर' काव्यसंग्रहाची पुष्पवृष्टी करून दिंडी काढली. मोठ्या प्रमाणात-सुमारे ७५ टक्के महिलावर्ग उपस्थित होता. विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योगपती श्री नितीन भागवत, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता श्री एस के सुरवसे व त्यांच्या पत्नी, सपत्नीक पोलिस अधिकारी श्री गंगाधर देवडे,कवि विलास कुंभार,निवेदक श्री नारायण एखतपूरकर, अशोक महाराज गोरे, सपत्नीक डॉ.राजाळे, साहित्यिका अनुसया कुंभार,बिल्डर श्री हर्षद ठुमर व पत्नी रेखा, श्री. व सौ. भारती शिंदे, सौ.इंदू वाष्र्ण्येय यांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली . कवयित्रीचे पती डॉ. ए.टी.कुंभार ( निवृत्त आय.ए.एस. ) यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

ठाणे ■ बुधवार
१४ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# निवडणूक ड्युटीवरील शिक्षकांना सुट्टीची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : दिनांक 15 जानेवारी 2026 रोजी संपूर्ण महाराष्ट्रमध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका होणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील महापालिकांमध्ये अनेक शिक्षकांना निवडणुकी संदर्भात ड्युटी लागलेली आहेत. यामुळे शाळेतील शिक्षकांना दिनांक 14 जानेवारी 2026 रोजी मतदारांचे साहित्य घेऊन जाऊन, मतदान होणाऱ्या ठिकाणी ते लावणे तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच 15 जानेवारी 2026 रोजी मतदान प्रक्रिया राबवणे. मतदान प्रक्रिया पूर्ण होण्याकरता रात्री 9.00 ते 10.00 वाजतात. हे संपूर्ण साहित्य पुन्हा केंद्रावर घेऊन जाताना रात्री खूप उशीर होतो. सतत दोन दिवस कार्य करून शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनीना यामध्ये खूप मानसिक त्रास होतो. तसेच शिक्षक इलेक्शन ड्युटीवर असल्याने शाळांमध्ये मुलांना शिक्षण देण्याकरिता कोणी नाही. शाळा कोण चालवणार. म्हणून सहानुभूतीपूर्वक विचार करून दिनांक 16 जानेवारी 2026 रोजी निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनींना सुट्टी जाहीर करावी व दि.14 ते 16 जानेवारी 26 रोजी शाळांना सुट्टी द्यावी अशी मागणी कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## खारेपाट विभागाला धुमकेतूसारखे नेतृत्व नको - सी. आर. म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : खारेपाट हा केवळ भौगोलिक भाग नसून कष्टकरी, मच्छीमार, शेतकरी व कामगारांच्या संघर्षातून उभा राहिलेला स्वाभिमान आहे. मात्र जाणीवपूर्वक राजकीय दुर्लक्ष, संकुचितपणा आणि निष्क्रीय नेतृत्वामुळे हा भाग विकासापासून वंचित ठेवला जात असल्याची तीव्र टीका सामाजिक कार्यकर्ते सी. आर. म्हात्रे यांनी केली आहे.

सिंचन, रस्ते, पूल, आरोग्य व शिक्षणासाठी आंदोलने, उपोषणे व निधी मंजुरी होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणीत अडथळे आणले जात आहेत. कामे अर्धवट ठेवली जात असून लोकप्रतिनिधी मौन बाळगत असल्याचा आरोप त्यांनी केला. खारेपाट सक्षम झाला तर प्रश्न विचारणारी जनता उभी राहील, या भीतीपोटी विकास रोखला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्थानिक रोजगार, विशेषतः मोठ्या कंपन्यांत स्थानिकांना संधी न मिळणे, तरुणांचे शोषण आणि अवलंबित्व टिकवण्याचा डाव असल्याची टीकाही करण्यात आली. केवळ फोटोसेशन आणि भाषणांपुरते मर्यादित नेतृत्व नको, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे, प्रशासन व साटेलोट्याला जाब विचारणारे नेतृत्व हवे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

खारेपाटला आता लाचार नव्हे तर लढाऊ, अपंग नव्हे तर सक्षम आणि मूक नव्हे तर प्रश्न विचारणारे नेतृत्व हवे आहे. त्यासाठी जनतेने गप्प बसण्याची सवय सोडून योग्य नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन सी. आर. म्हात्रे यांनी केले.

## 'शरीर तंदुरस्त ठेवण्यात आहार महत्वाचा'
### - कृषी शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. सुभाष पाळेकर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण** : कोणताही रोग स्वतःहुन येत नसतो, त्याला निमंत्रित केले जात असते. त्यासाठी आहार अत्यंत महत्वाचा असतो. जसें भोजन तसे विचार; जसे विचार तसे आचार असे प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. सुभाष पाळेकर यांनी केले. संवेदना चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित विषमुक्त अन्न चळवळ, समृध्द शेती, परसबाग, छतशेती मार्गदर्शन कार्यक्रमात चला परत निसर्गाकडे या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय एक दिवसीय शिबीरात ते पनवेल उरण आगरी समाज मंडळाच्या सभागृहात बोलत होते.

रोगप्रतिकारक शक्ती हे मानवाला निसर्गाने दिलेले मोठे वरदान असून बलवान रोगप्रतिकारक शक्ती असल्यास रोग होत नाहीत असे स्पष्ट करताना डॉ. पाळेकर म्हणाले की शरीराच्या पेशींची संख्या नियंत्रित करणाऱ्या यंत्रणेच्या विरोधात जेंव्हा आपण आपली वागणूक ठेवतो तेव्हा त्या यंत्रणेत अडथळे येतात आणि पेशींची अनियंत्रित वाढ होऊ लागते. आपण अधिक आम्लधर्मी भोजन घेतले तर आतड्यांना जखमा होऊ लागतात. त्या दुरुस्त करण्याचे काम कोलेस्टोरॉल करते जे आपल्या लिव्हरमध्ये निर्माण होते. विषारी अन्नामुळे लिव्हर काम करत नाही. परिणामी आतड्यांच्या जखमा दुरुस्त करणारी व्यवस्था बिघडते व अनेक पेशी तयार होतात, पेशींची अनिर्बंध वाढ होते व त्यातून आतड्यांमध्ये व्रण - अल्सर तयार होतात व पुढे जाऊन त्यांचे रुपांतर कॅन्सरमध्ये होऊ शकते.

आजारांपासून दूर रहायचे असेल तर काय करायला हवे, आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करायला हवा याबाबत अशी विविध उदाहरणे देत डॉ. पाळेकर यांनी धान्य, भाज्या, दुध व दुग्धोजन्य पदार्थ, बेकरीतील पदार्थ व ईतर स्वरुपाच्या अन्नाबद्दल अतिशय मौलिक माहिती उपस्थितांना ओघवत्या भाषेत करुन दिली. चाललेल्या या कार्यक्रमास सुमारे साडेचारशेहुन अधिक जिज्ञासूंनी उपस्थिती दर्शवून या माहितीचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संवेदनाच्या अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर, खजिनदार आरती दामले, वसुधा देसाई, अनघा भाताणकर, संवेदनाचे अन्य सदस्य तसेच सुभाष पाळेकर कृषी जन आंदोलनाच्या सक्रिय कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## निवडणूक कर्तव्यावरील शालेय कर्मचाऱ्यांना मतदानानंतरच्या दिवशी विशेष रजा देण्याची मागणी
### - शिक्षण क्रांती संघटना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : संपूर्ण राज्यात दिनांक 15 जानेवारी 2026 रोजी महानगरपालिकेच्या निवडणुका संपन्न होत आहे या निवडणुकीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात शालेय कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे तरी या निवडणूक कामी दिनांक 14 जानेवारी ते 15 जानेवारी 2026 या दोन दिवसांमध्ये हे कर्मचारी सलग ३६ तास निवडणूक कर्तव्य बजावणार आहेत त्यानंतर दुसऱ्या दिवशी या कर्मचाऱ्यांना सकाळी सात वाजता आपल्या शालेय कर्तव्यावर हजर व्हावे लागणार आहे त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर कमालीचा ताण येऊन त्यांच्या स्वास्थ्यावर परिणाम होणार असल्याचे दिसते तरी या निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या शालेय कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दुसऱ्या दिवशी एक विशेष रजा देण्यात यावी याबाबत शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. कृष्णाथ पांचाळ यांना लेखी निवेदन दिले आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी राज्याचे निवडणूक आयुक्त यांना पत्र देऊन ज्या महानगरपालिकामध्ये निवडणुका आहेत त्या आयुक्तांना विशेष रजा देण्याबाबत शिफारस करावी व निवडणूक कामी कर्तव्य बजावणाऱ्या शालेय कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दुसऱ्या दिवशी विशेष रजा द्यावी यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना व प्राचार्यांना सूचित करावे असेही लेखी निवेदनातुन विनंती केली आहे.

## प्रदीप रामचंदानी पक्षाचा वचननामा प्रसिद्ध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : शहराला २४ तास पाणी,संपूर्ण रस्ते काँक्रीटचे, २०२१ पर्यंतच्या घरांना मालकी हक्क, कचरामुक्त, गुंडगिरी मुक्त शहर आदी मुद्दे भाजपच्या सोमवारी प्रसिद्ध झालेल्या वचननाम्यात घेतले असून, गेल्या निवडणुकीत बहुतांश हेच मुद्दे होते. भाजप जिल्हा कार्यालयात आ. कुमार आयलानी, शहराध्यक्ष राजेश वधारिया, निवडणूकप्रमुख प्रदीप रामचंदानी यांनी पक्षाचा वचननामा प्रसिद्ध केला.रिंग रोड रस्त्याचे रुंदीकरण, वीजपुरवठा वाहिन्या भूमिगत करणे, शहर मेट्रोला जोडणे, हरित शहर, ४०० बेडचे अद्ययावत रुग्णालय आदी आश्वासन देण्यात आले आहे.

# पडघ्यात काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील अंखड हरीनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या किर्तनाने करण्यात आली.

दरवर्षी प्रमाणे सांधुसंताच्या आशिर्वादाने वारकरी सांप्रदाय मंडळ (रजि.) यांच्या वतीने अंखड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दिंनाक ३ ते १० जानेवारी दरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदीर प्रांगणात घेण्यात आला. सप्ताह मंडळाचे हे ४२ वे वर्ष होते. यावेळी आठवडाभर दररोज पहाटे ते रात्रीपर्यंत विविध आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात रात्री हभप अमृताश्रम स्वामी महाराज, राष्ट्रीय किर्तनकार चारुदत्त महाराज आफळे, योगीराज महाराज गोसावी, उल्हास महाराज सुर्यवंशी, किर्तनचंद्रिका रोहीणीताई परांजपे, ज्ञानेश्वर महाराज नामदास, अँड. धर्माचार्य शंकर महाराज शेवाळे यांनी विविध अभंग समाजप्रबोधन पर सुश्राव्य किर्तन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी पारायण मार्गदर्शक म्हणून हभप कमळावर महाराज विशे बेडीजगांव शहापुर, व शिव महापुराण कथा सादर करणारे हभप भागवताचार्य रमाकांत महाराज शास्त्री पडघा उपस्थित होते. तर ९ जानेवारी

### महाप्रसादास मोठी गर्दी

रोजी पारंपारिक वेशभूषेत टाळ मृदूंगाच्या गजरात संपूर्ण पडघे गावातुन पालखी सोहळा काढण्यात आला होता यावेळी नागरीकांनी घरासमोर रांगोळी काढुन पालखीची मनोभावे आरती केली तर त्याच दिवशी सायंकाळी हरीनाम सप्ताहाचे ठिकाणी दीपज्योती कार्यक्रम घेण्यात आला यावेळी विवीध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तर या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता १० जानेवारी रोजी हभप भागवताचार्य गणेश महाराज फुलकुंठवार, कादंळी यांच्या सुश्राव्य किर्तन व महाप्रसादाने करण्यात आली यावेळी अंखड हरीनाम सप्ताहात उपस्थित राहुन विविध सेवा देणारे, मृदूंगमणी, गायनाचार्य, हार्मोनियमवादक, विणेकरी, भालदार चोपदार, टाळ साथकरी, अन्नदाते, यांचा सत्कार करण्यात आला. तर यावेळी पडघा व परिसरातील नागरीकांनी श्रवणसुखाचा व महाप्रसाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती तसेच हा अंखड हरीनाम सप्ताह यशस्वी होण्यासाठी वारकरी सांप्रदाय मंडळाच्या सर्व पदाधिकारी सदस्य व नागरीकांनी मेहनत घेतली.

## कलाशिक्षक मनोज पाटील यांच्या निसर्गचित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : वासिंद जवळील टहारपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर या माध्यमिक शाळेत काम करणारे कलाशिक्षक मनोज पाटील यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या निसर्ग चित्रांचे प्रदर्शन मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी मध्ये आयोजित केले आहे.

सौंदर्य हे सृष्टीत नसून ते आपल्या दृष्टीत आहे रोजच्या कामाच्या व्यापातून माणूस जेव्हा काही दिवसांची उसंत घेतो आणि त्या ठिकाणी भटकंती करतो व आपल्या जीवनातील काही क्षण सुखात घालवण्यासाठी निसर्गाच्या सानिध्यात राहतो तेव्हा निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेऊन आपल्या आठवणीची साठवण करत असतो व त्या हुबेहूब जल रंगाने साकारतो व ते प्रदर्शित करतो आणि सर्वांना भुरळ घालतो. ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील वासिंद जवळील टहारपूर या विद्यालयातील कलाशिक्षक यांनी अभयारण्याच्या सानिध्यात जाऊन निसर्गातील विविध रूपे चित्रीत करून रंगप्रती या प्रदर्शनातून साकारून ती अनेक निसर्गप्रेमी कलावंतांना पोचवण्याची संधी निर्माण करतो व भुरळ घालतो अशा या त्यांनी साकारलेल्या वेगवेगळया निसर्गचित्रांचे प्रदर्शन मुंबई येथील जहांगीर आर्ट या गॅलरीमध्ये दिनांक 12 जानेवारी ते 18 जानेवारी2026 पर्यंत आयोजित केलेले आहे अनेक निसर्गप्रेमी कला बंधू भगिनींनी हे प्रदर्शन पाहून निसर्गातील निसर्ग चित्रांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन कलाशिक्षक मनोज पाटील यांनी केले आहे.

## पेण येथे बाफना फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्ररोग निदान शिबीर







**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्यूट, मुंबई आणि बाफना फाउंडेशन पेण रायगड यांच्या सहयोगाने आयोजित केलेल्या मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया आणि संपूर्ण नेत्र रोग निदान शिबिर आज १३ जानेवारी २०२६जैन हॉल, बाजारपेठ पेण येथे आयोजित करण्यात आले होते.

तज्ञ व अनुभवी डॉक्टर यांच्या टिमने दृष्टि चाचणी, नेत्र दबाव चाचणी,शुगर आणि बी पी आणि मोतीबिंदूची चाचणी डायबेटिक रेटिनोपॅथी व चष्म्याच्या नंबरची चाचणी करण्यात आली आजही या मोफत तपासणी शिबिराचा लाभ अनेक पेण शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी घेतला. तपासणी केल्यानंतर चष्मा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे. आज मोतिबिंदू शस्त्रक्रियासाठी निवडलेल्या रुग्णांना शिबिराच्या दिवशी मुंबई येथे नेण्यात येऊन रुग्णांना मोतिबिंदू शस्त्रक्रिया, वाहन सुविधा, राहणे, जेवण हे सर्व निःशुल्क ठेवण्यात आले होते.

या शिबिराविषयी माहिती देताना बाफना फाउंडेशनचे अध्यक्ष विशाल बाफना यांनी सांगितले की मागील तीन महिन्यापासून बाफना फाउंडेशनच्या वतीने नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात येत असून आजपर्यंत 300 पेक्षा जास्त रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्याचबरोबर शेकडो नागरिकांना चष्म्याचे वाटप करण्यात आले आहेत आजही रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले आहे तरी शहरी आणि ग्रामीण भागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या नेत्र चिकित्सा शिबिराचा लाभ घ्यावा आणि आपले आरोग्य उंचवावे असे आवाहनही करण्यात आले आहे.

# मुरबाड कला व क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण सोहळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**मुरबाड(दिलीप पवार)** : जनसेवा प्रतिष्ठान, मुरबाड यांच्या वतीने आयोजित मुरबाड कला व क्रीडा महोत्सव २०२६ ची सांगता बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संप्पंन्न झाला. गेल्या तीन दिवसांत मुरबाड तालुक्यातील होतकरू कलाकार व क्रीडापटूंना हक्काचे व्यासपीठ देण्याचे कार्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीपणे केले. तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध क्रीडा प्रकार व कलाप्रकारांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या कलाकार व क्रीडापटूंना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या वेळी सभागृहात शेकडो पालक, विद्यार्थी व खेळाडूंची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गोटीरामभाऊ पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेदे मा. सदस्य व बँकेचे माजी अध्यक्ष उल्हास भाऊ बांगर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधुकर घुडे, कांतीलाल कंटे, माजी सभापती दीपक पवार,बाजार समिती सभापती दीपक खाटेघरे, रामभाऊ दळवी, पांडुरंग कोर, प्रकाश पवार, लक्ष्मण सरनिंगे, मनोहर इसामे, नगरसेवक विनोद नार्वेकर, मधुकर मोहपे, मा. नगराध्यक्ष मुकेश विशे, मा. नगरसेवक रवींद्र देसले, जि. प. सदस्य सौ. प्राजक्ता भावार्थे, अशोक पाटोळे, प्राचार्य बडगुजर सर, यांच्यासह जनसेवा प्रतिष्ठानचे सरचिटणीस भास्कर हरड, हरिश्चंद्र खापरे, धनाजी खापरे, दीपक थोरात, भगवान भगत, भास्कर जामघरे, रवींद्र मोहपे, बाळकृष्ण पवार, दशरथ विशे, रमेश तुंगार, विनोद कोर, राजेश पाटील, मुकुंद गायकवाड, धनश्री खापरे, संजय घागस, नितीन घागस, सौरभ पवार, किरण दळवी, तुषार इसामे, महेश बांगर, शंकर विशे, ज्ञानेश्वर खापरे आदी मान्यवर उपस्थित होते.

**99 स्पर्धकांचा गौरव**

अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने बक्षीस वितरण पार पडले. याप्रसंगी अध्यक्ष सुभाष पवार यांनी सर्व बक्षीसधारक विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून भविष्यात हा महोत्सव मुरबाडकरांचा उत्सव व्हावा यासाठी सर्वांच्या सहकार्याने अधिक भव्य स्वरूपात आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. प्रमुख पाहुणे उल्हास बांगर यांनी भजन स्पर्धा अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी नियोजन करण्याचे आवाहन करत, भविष्यातील उपक्रमांना पाठबळ देण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी ग्रामीण भागातून आलेल्या बालकलाकारांनी सादर केलेले लोकनृत्य विशेषतः कृष्णभूमिकेतील सादरीकरण अत्यंत प्रभावी व मंत्रमुग्ध करणारे असल्याचे सांगत त्यांचे विशेष कौतुक केले. महोत्सवात सहभाग नोंदवून यश संपादन करणाऱ्या सर्व स्पर्धकांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व सामाजिक भान जपत कार्य करणाऱ्या जनसेवा प्रतिष्ठानच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. या महोत्सवात जवळपास ९९ स्पर्धक व कलाकारांचा रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान विशे, विनोद कोर व राजेश पाटील यांनी केले, तर सांगता समारंभाचे आभार प्रदर्शन धनाजी दळवी यांनी केले.

## वाशिंद शहर कॉंग्रेस समिती अध्यक्ष धामणे निलंबित

### शांताराम धामणे यांना पक्षशिस्तीचा वारंवार भंग केल्याप्रकरणी पक्षातून तसेच वाशिंद अध्यक्षपदावरून निलंबित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : वाशिंद शहर कॉंग्रेस कमिटीचे शहर अध्यक्ष शांताराम धामणे यांना पक्षशिस्तीचा वारंवार भंग केल्याप्रकरणी पक्षातून तसेच वाशिंद अध्यक्षपदावरून निलंबित करण्यात आले. शहापूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष जितेश विशे यांनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व माजी खा. सुरेश टावरे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई केली आहे. धामणे यांनी प्रदेश स्तरावरील पदाधिकाऱ्यांशी बोलताना अर्वाच्य भाषेचा वापर केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.यापूर्वीही त्यांनी पक्षश्रेष्ठींविरोधात आक्षेपार्ह व चुकीची वक्तव्ये केल्याचे निदर्शनास आले होते. या संदर्भात त्यांना यापूर्वी समज देण्यात आली होती.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024